## शुध्दीपत्रक

जा.क्र.१३८२९/स्कुल बस/प्रापका/पुणे/१६
प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे
३९, डॉ.आंबेडकर रोड,
संगम पुलाजवळ, पुणे-०१
दुरध्वनी : ०२०-२६०५८०८० / ९०
ई-मेल : mh12@mahatranscom.in
दिनांक : १९.११.२०१६

**प्रति,**
**मा.मुख्याद्यापक / प्राचार्य,**
**.....................**
**.....................**

**विषय : शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या चालकांसाठी कार्यशाळा.**

**संदर्भ : १) वाहन चालन प्रशिक्षण व संशोधन संस्था, पुणे यांचे पत्र क्र.१०७ दिनांक १४.१०.२०१६**
**२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.१२८१९ दिनांक १८.१०.२०१६**

**मा.महोदय,**

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूक होण्याच्या दृष्टीने, शाळा प्रशासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या स्कुल बसेस चालकांसाठी आयडीटीआर, पुणे मार्फत प्रत्येक शनिवार व रविवारी विशेष प्रशिक्षण व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याबाबत संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदर पत्रातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

सदर कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्कुल बस चालकांस प्रशिक्षण शुल्क म्हणून रु.१८००/- भरावे लागणार आहे. या रक्कमेमध्ये सेवाकर तसेच चहापान व भोजनाची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच त्यांना 'ट्रेनिंग कीट व प्रमाणपत्र' देण्यात येणार आहे. तरी आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कुल बस चालकांना सदरील बाबत अवगत करावी, ही विनंती.

आपल्या माहिती व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

१९/११/१६

**सदस्य सचिव**
**शा.वि.वा.जिल्हा सुरक्षितता समिती**
**तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.**

प्रत : मा.अध्यक्ष, शालेय विद्यार्थी वाहतूक सुरक्षितता समिती तथा पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना माहितीसाठी सविनय सादर.

F:\Backup\transport sec\Navale\Covering letter.doc.doc

Scanned by CamScanner